महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर,सदर,नागपूर

दुरध्वनी क्रमांक : २५६५१४३ फॅक्स क्रमांक : ०७१२-२५६१६६३

E-mail:ronagpur.dte@gmail.com Website:www.rdtenagpur.org.in

## अपंग व मागासवर्गीयांच्या अनुशेष विशेष मोहीमेअंतर्गत रिक्त पदांसाठी जाहीरात

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचे अधिनस्त शासकीय संस्थामधील खालील नमुद केलेल्या निकषांप्रमाणे व प्रवर्गातील गट "क" व गट "ड" संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांचे जाहीरातीमध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या विहीत नमुन्यात **भरलेले परिपूर्ण अर्ज सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांच्या कार्यालयांत दिनांक २४/१०/२०११ पर्यंत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.** अर्जाचे लिफाफ्यावर ठळक अक्षरात " ....................." या पदासाठी अर्ज असे लिहीण्यात यावे. नमुद केलेल्या दिनांकानंतर व टपालाचे दिरंगाईने उशिरा प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. जाहिरातीमध्ये नमुद करण्यात आलेली पदे नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील आहेत. **जाहीरात या कार्यालयाचे वेबसाईट www.rdtenagpur.org.in वर Download मध्ये सुध्दा प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन जे उमेदवार लेखी परिक्षेकरीता पात्र ठरतील अशा उमेदवारांची यादी तसेच परिक्षेकरीता अपात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांची यादी या कार्यालयातील सुचना फलकावर व कार्यालयाचे www.rdtenagpur.org.in या संकेत स्थळावर डाऊनलोड (Download) मध्ये प्रदर्शित करण्यात येईल.** जाहिरातीत नमुद केलेल्या पदांची संख्या कमी-जास्त होऊ शकते.

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार | पद संख्या | प्रवर्ग व पदसंख्या | समांतर आरक्षण | शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **लघुलेखक (निम्नश्रेणी)** | रु.९३००-३४८००/- ग्रेड वेतन - रु.४३००/- | ०१ | अनुसूचित जमाती | -- | एस.एस.सी. उत्तीर्ण लघुलेखनाचा वेग किमान १०० श.प्र.मि. इंग्रजी टंकलेखन ४०श.प्र.मि. मराठी टंकलेखन ३०श.प्र.मि. | लेखी परिक्षा लघुलेखन व टंकलेखन परिक्षा व मुलाखत |
| २. | **भांडारपाल** | रु.५२००-२०२००/- ग्रेड वेतन - रु.२८००/- | ०१ | वि.मा.प्र. | -- | एस.एस.सी. गणित व विज्ञान विषयासह उत्तीर्ण व शासकीय किंवा शासनमान्य आस्थापना अंतर्गत भांडारपाल या पदावरील कामाचा किमान दोन वर्षाचा अभियांत्रिकी भांडार हाताळण्याचा अनुभव असणे आवश्यक. इंग्रजी टंकलेखन ४०श.प्र.मि. मराठी टंकलेखन ३०श.प्र.मि. | लेखी परिक्षा टंकलेखन परिक्षा व मुलाखत |
| ३. | **प्रयोगशाळ सहाय्यक** | रु.५२००-२०२००/- ग्रेड वेतन - रु.२०००/- | ०३ | अ.जा. – १ | खेळाडू | एस.एस.सी. गणित व विज्ञान विषयासह उत्तीर्ण व प्रयोगशाळेत काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य | लेखी परिक्षा व मुलाखत |
| | | | | भ.ज.क – १ | महिला | | |
| | | | | भ.ज.ड - १ | -- | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | **सहाय्यक ग्रंथपाल** | रु.५२००-२०२००/-<br>ग्रेड वेतन - रु.२०००/- | ०१ | वि.जा.अ | -- | एस.एस.सी. उत्तीर्ण तसेच ग्रंथपालाचे किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या संस्थेचे लायब्ररी सायन्स प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक व ग्रंथालयात काम केल्याचा किमान एक वर्षाचा अनुभव **किंवा** मोठ्या ग्रंथालयातील काम केल्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव. | लेखी परिक्षा व मुलाखत |
| ५. | **कनिष्ठ लिपीक** | रु.५२००-२०२००/-<br>ग्रेड वेतन - रु.१९००/- | ०२ | अपंग - १<br>भ.ज.ब १ | मुक व कर्णबधीर<br>-- | एस.एस.सी. उत्तीर्ण, इंग्रजी टंकलेखन ४०श.प्र.मि. मराठी टंकलेखन ३०श.प्र.मि. | लेखी परिक्षा टंकलेखन परिक्षा व मुलाखत |
| ६. | **वाहन चालक** | रु.५२००-२०२००/-<br>ग्रेड वेतन - रु.१९००/- | ०१ | अ.जा. | माजी सैनिक | चौथा वर्ग उत्तीर्ण व जड वाहन/ हलके वाहन चालविण्याबाबत मोटार व्हेईकल ॲक्ट,१९३९ नुसार अनुज्ञप्ती धारण करणे आवश्यक आहे. वाहन (कार/जीप) चालविण्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव आवश्यक. जीप व मोटार कार दुरुस्तीचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक. तसेच उमेदवार शारिरिकदृष्टया सक्षम व त्यास विभागातील भौगोलीक परिसराचे ज्ञान असणे आवश्यक. | लेखी परिक्षा, वाहन चालविण्याचे प्रात्यक्षिक, मुलाखत |
| ७. | **हमाल** | रु.४४४०-७४४०/-<br>ग्रेड वेतन - रु.१३००/- | ०१ | अपंग - १ | मुक व कर्णबधिर | चौथा वर्ग पास | लेखी परिक्षा व मुलाखत |

**वयोमर्यादा** : जाहीरातीतील नमुद सर्व पदांकरीता उमेदवाराचे वय जाहिरातीच्या दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी नसावे तसेच सर्व साधारण प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथीलक्षम म्हणजेच ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच अपंग, प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, पदविधर अंशकालीन, खेळाडू, भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी वयोमर्यादा शासन नियमानुसार शिथीलक्षम राहील.

**अर्ज सादर करण्याची पध्दत व पाठविण्याचा पत्ता** : इच्छुक व अर्हता प्राप्त उमेदवारांनी ए-४ आकाराचे कागदावर टंकलिखीत / सुवाच्छ हस्तांक्षरात परिपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर — ४४० ००१ या पत्यावर पाठवावेत.

**परिक्षा शुल्क** : सर्व पदांच्या परिक्षेकरीता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.२००/- व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.१००/- परिक्षा शुल्क असेल. सदर परिक्षा शुल्क Joint Director of Technical Education R.O. Nagpur Payable at Nagpur यांचे नांवे काढलेला राष्ट्रीयकृत बँकेच्या डी.डी. (Demand Draft) व्दारे अर्जासोबत द्यावे लागेल. अन्य नावाने काढलेला व राष्ट्रियकृत बँकेतून न काढण्यात आलेला तसेच कमी रक्कमेचा डी.डी. स्विकारला जाणार नाही. माजी सैनिकांसाठी परिक्षा शुल्क लागु नाही. तसेच परिक्षा शुल्क हा ना-परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

**महत्वाच्या सुचना :**

०१. सर्व पदांच्या पात्र उमेदवारांना लेखी परिक्षा अनिवार्य आहे.

०२. अंतिम गुणवत्ता यादी लेखी परिक्षा, प्रात्यक्षिक परिक्षा व मुलाखत यांचे एकूण गुणांवरुन ठरविण्यात येईल.

०३. उमेदवारांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक आहे.

०४. लघुलेखक, भांडारपाल, कनिष्ठ लिपीक व वाहन चालक या पदांकरीता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित व विभागाची माहीती इ. विषयावरील प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन एक तासाची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परिक्षा घेण्यात येईल.

०५. प्रयोगशाळा सहाय्यक व सहाय्यक ग्रंथपाल या पदांकरीता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित व विभागाची माहीती इ. विषयावरील प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन १ १/२ तासाची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परिक्षा घेण्यात येईल.

०६ हमाल पदांकरीता मराठी, सामान्य ज्ञान, भौगोलिक ज्ञान इ. विषयावरील प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन १ तासाची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परिक्षा घेण्यात येईल.

०७. अर्जासोबत (अर्जातील माहीतीचे पृष्ठ्यार्थ) शैक्षणिक अर्हता, वय, जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास), अनुभव प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबतचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र इ. व इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. तसे न केल्यास अर्ज अपुर्ण समजून नाकारण्यात येईल. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत उमेदवारांनी धारण केलेलीच अर्हता विचारात घेतल्या जाईल. त्यानंतर सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतल्या जाणार नाही.

०८. हमाल पद वगळून वरिल सर्व पदांकरीता D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा 'O' स्तर किंवा 'B' स्तर किंवा 'C' स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE) मुंबई यांच्याकडील अधिकृत परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आंत सादर करणे आवश्यक राहील. विहीत मुदतीत संगणक हाताळणे / वापराबाबतचे विहीत प्रमाणपत्र सादर न केल्यास तात्काळ सेवा समाप्त करण्यात येईल.

०९. उमेदवारांना लेखी परिक्षा / चाचणी परिक्षा / प्रात्यक्षिक / मुलाखत यासाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१०. अर्जासोबत रु.५/- ची तिकीटे लावलेला स्वतःचा संपूर्ण पत्ता लिहीलेला लिफाफा जोडावा.

११. आवेदन पत्रावर उजव्या वरील बाजूला नुकताच काढलेला पासपोर्ट आकाराचा फोटो लावण्यात यावा.

१२. लेखी परिक्षा / मुलाखतीचे वेळापत्रक मुलाखत पत्रात (Call Letter ) नमुद करण्यात येईल.

१३. शासन निर्णय क्र.अनियो-१००५/१२६/सेवा-४, दि. ३१/१०/२००५ प्रमाणे "परिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना" लागू राहील.

१४. समांतर आरक्षणातील योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधीत प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवारांचा त्यासाठी विचार केला जाईल.

१५. शासकीय / निमशासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांचे मार्फत कार्यालयाचे "ना-हरकत प्रमाणपत्र" घेऊन या कार्यालयांस सादर करावे.

१६. पुर्णवेळ कामाचा अनुभव ग्राह्य धरला जाईल, अर्धवेळ मानधनावरील सेवा ग्राह्य धरली जाणार नाही.

१७. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम- २००१ ( सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २१/०१/२००४ पासून अंमलात आणला आहे. या अधिनियमातील नियम क्र. ४ (२) (दोन) खालील परंतूकांन्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता सर्व प्रवर्गांना लागु असेल, अशी तरतूद केलेली आहे. सदर तरतूदीनुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड व विमाप्र यांना लागु आहे. त्यानुसार या प्रवर्गातील उमेदवारांची जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम अधिकाऱ्यांचे दिनांक ०१/०४/२०११ नंतर निर्गमित केलेले (नॉन-क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१८. उमेदवारांची निवड झाल्यानंतर रुजू होतेवेळी मागासवर्गीय उमेदवारांना "जात वैधता प्रमाणपत्र" सादर करणे आवश्यक आहे. तथापि त्याअभावि सदरच्या उमेदवारांना तीन महिन्याचे आंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करुन नंतरच रुजू करुन घेता येईल.

१९. उपरोक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव किमान अर्हता व अनुभव दर्शवित आहे. तथापि, उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभवाचे उमेदवार प्राप्त झाल्यास त्यांचा अंतिम निवडीसाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल.

२०. शासन अधिसूचना एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा दिनांक २८/०३/२००५ नुसार नमुना "अ" नियम ४ प्रमाणे लहान कुटूंबाचे प्रतिज्ञा पत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. सदर नमुना आवेदनामध्ये खालील भागात नमुद केलेला आहे.

२१. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहीती / कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२२. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये. निवडी साठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

२३. निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती विभागात कोठेही करण्यात येईल व तो बदलीस पात्र राहील.

२४. अपंग उमेदवारांकरीता अपंगाचे प्रमाण ४० टक्के पेक्षा कमी नसावे, अर्जासोबत जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अपंगाबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

२५. अतिरिक्त संवर्ग, आंतरविभागीय समायोजन इ. व अन्य कारणांमुळे पदसंख्या व (पदसंख्येत कमी / जास्त होणे) आरक्षणामध्ये बदल होऊ शकते. सदरची पदे मा.आयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांचेकडील अतिरिक्त कक्षाकडून उमेदवार प्राप्त होण्याचे ना-हरकत प्रमाणपत्राचे अधिन राहून देण्यात येत आहे. अतिरिक्त कक्ष, नागपूर यांच्याकडून मागणीनुसार उमेदवार उपलब्ध झाल्यास उक्त पदामध्ये बदल होऊ शकतो. याबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

२६. एकापेक्षा जास्त पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास पदनिहाय स्वतंत्र अर्ज करावा.

२७. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास त्याचा नोंदणी क्रमांक अर्जात नमूद करावा व प्रमाणपत्राची छायाप्रत अर्जासोबत जोडावी. सदर उमेदवारांनाही जाहीरातीतील सूचना / बाबी लागू होतील.

२८. जाहीरातीचे अनुषंगाने कार्यवाही न करण्याचे वा ती रद्द करण्याचे सर्व अधिकार सहसंचालकांनी राखुन ठेवले आहेत.

२९. पद भरतीबाबतचे संपूर्ण वेळापत्रक **www.rdtenagpur.org.in** या संकेतस्थळावर घोषित करण्यात येईल.

( गुलाब ठाकरे )
**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.**

# अर्जाचा नमुना

**कार्यालयीन वापराकरीता**

आवक क्रमांक : ................ संगणक नोंदणी क्र............. आसन क्र. ............

| |
|---|
| उमेदवाराचा फोटो |

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्रनिकेतन परीसर, मंगळवारी बाजार,
सदर, नागपूर.

विषय : ..............................या पदासाठी अर्ज

१. उमेदवाराचे संपूर्ण नांव : ....................................................................
(आडनांव) (स्वत:चे नांव) (वडीलांचे/पतिचे नांव)

२. लिंग : पुरुष / स्त्री (लागु नसेल ते खोडावे)

३. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता : ..............................................................
(पिनकोड क्रमांकासह) ..............................................................

४. दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक (एसटीडीसह) : ................................................

५. जात (पोटजातीसह) : ........................................................................

६. जन्म तारीख : ..............................................................................
(वयाचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखल्यावर नोंद केल्याप्रमाणे)

७. दिनांक ......... रोजीचे वय : .......... वर्ष ......... महिने

८. विवाहीत / अविवाहीत ................
(विवाहीत असल्यास लहान कुटूंब असल्याचे नमुना अ मधील प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे)

९. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाचे नांव, पत्ता, नोंदणी क्रमांक व तारीख (असल्यास) :
..............................................................................................

१०. धनाकर्ष क्रमांक (डी.डी. क्रमांक) : ......................... दिनांक ................. रक्कम ..........
बँकेचे नांव : ..............................................................................

११. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे किंवा नाही : ................................................

१२. शक्षणिक अर्हता :

| परिक्षा | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | शाळा / विभागीय मंडळ/ विद्यापीठ / संस्था | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१३. अनुभव :

| अ. क्र. | शासकीय / निमशासकीय / अशासकीय आस्थापनेचे नांव | वेतनश्रेणी | सेवेचा कालावधी | | | | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | वर्ष | महिने | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

१४. संगणक परिक्षा उत्तीर्ण : ...................................................................................

१५. उमेदवार माजीसैनिक आहे काय : ..................... अपंग आहे काय : ...................

मी याव्दारे जाहीर करतो/करते की, माझ्या माहीती व ज्ञानानुसार वरील तपशिल सत्य व अचूक आहे. कोणताही तपशिल खोटा आढळल्यास माझी उमेदवारी / नियुक्ती रद्द झाल्यास अथवा होणाऱ्या कार्यवाहीस मी पात्र असेल. अर्ज परिपूर्ण नसल्यास अथवा पृष्ठ्यर्थ आवश्यक कागदपत्रे जोडली नसल्यास अर्ज रद्दबातल ठरविला जाईल व त्याबाबत मला काहीही कळविले जाणार नाही, याची मला जाणीव आहे. मी प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो की, वरील माहीती जाणिवपूर्वक व विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. त्यापैकी कोणतीही माहीती खोटी आढळल्यास माझे अर्ज फेटाळून लावण्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी कांहीही तक्रार / हरकत राहणार नाही. जाहीरातीतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही

.................................................................................................................................

महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम — २००५ मधील

प्रतिज्ञापत्राचा नमुना - अ प्रतिज्ञापत्र (विवाहीत उमेदवारांसाठी)

नमुना - अ

(नियम — ४ पहा)

मी श्री/श्रीमती/कु. ........................................... श्री.................................... यांचा मुलगा/यांची मुलगी / पत्नी वय ......... वर्ष, राहणार ................................................... याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी ........................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ............. (संख्या) इतके हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ......... आहे. (असल्यास जन्मतारिख नमुद करावी)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही

.................................................................................................................................

**<u>परिक्षेसाठी ओळखपत्र</u>**

१) पदाचे नांव : ...........................................

२) उमेदवाराचे संपूर्ण नांव : ...........................................

३) परिक्षेचा आसन क्रमांक : ...........................................

४) परिक्षा केंद्र : ...........................................

५) परिक्षेचा दिनांक व वेळ : ...........................................

६) उमेदवाराची नमुना स्वाक्षरी : ...........................................

पासपोर्ट आकाराचा फोटो चिपकवून तो साक्षांकीत करुनं घ्यावा.

**(फोटो राजपत्रित अधिकारी / विशेष कार्यकारी अधिकारी किंवा शाळेचे मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी साक्षांकीत करणे आवश्यक आहे. ओळख पत्रातील क्रमांक ३,४,५ वरील माहीती वगळून इतर माहीती उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी स्वतः भरावी)**